श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.जि.अहिल्यानगर यांना आरोग्य सेवक (पुरुष) या पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक- आरोग्य/आस्था-३/७२६/२०२५
अहिल्यानगर, दिनांक- १९/०८/२०२५

वाचा :- १. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.जि.अहिल्यानगर यांच्या कडील पत्र क्र. १४८/२०२४, दिनांक- २१/०६/२०२४
२. या कार्यालयाकडील दिनांक- ०४/०७/२०२५ रोजीचा चौकशी अहवाल
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१)(अ)

१. ज्या अर्थी श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.जि.अहिल्यानगर येथे कामकाजात गैरवर्तन करत असले बाबत संदर्भ क्र.१ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविणेत आले आहे. आपण जिल्हा परिषद कर्मचारी असुन सदैव निरपराद, सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. तथापि, आपण कर्तव्याचे पालन न केल्याने आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

२. ज्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधिन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांना आदेश बजावलेच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करीत आहे.

३.आणखी, असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढ्याकालावधीत श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांचे मुख्यालय ~~प्राथमिक आरोग्य केंद्र~~ ता.आ.अ. पं.स.पारनेर येथे राहिल. आणि श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांना ~~वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र~~ ता.आ.अ. पं.स.पारनेर यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

४.श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

५. निलंबनाचे कालावधीत, श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांना निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल. त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही. अथवा कोणताही खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांनी वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र टाकळीकाझी यांना सादर करावे.

६.निलंबनाचे कालावधीत श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र टाकळीकाझी हे करतील.

७.या आदेशाची नोंद श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष), यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

८.सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202508191002१9 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-08-2025 21:08:51
(आनंद भंडारी, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.प्रशांत बाबासाहेब कुलट, आरोग्य सेवक (पुरुष),
व्दारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.जि.अहिल्यानगर
प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.जि.अहिल्यानगर

२/-सदर आदेश संबंधितांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र--टाकळीकाझी जि.अ.नगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर
प्रत :- आरोग्य विभाग, अस्थापना-३, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी पं.स.पारनेर

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी, भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर